**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे-३३दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट

## ३ वर्षापासुन राहण्याची जागा बदलुन पोलीसांना गुंगारा देणा-या फरारी आरोपीस केले जेरबंद.

**चिखली पोलीस ठाणे गु.रजि.नं.१६३/२०२१ भादंवि कलम ३७९,३४** या गुन्हयातील सीआरपीसी कलम ८२ प्रमाणे गुन्ह्यातील फरारी आरोपी **विलास बाळशीराम मोरे, वय ३८ वर्षे, राह- संतोष फुगे यांच्या रुममध्ये भाडयाने,दिघी रोड,भोसरी पुणे** हा सुमारे ३ वर्षापासुन राहण्याची जागा बदलुन पोलीसांना गुंगारा देवुन राहत होता.

आज रोजी गुन्हे शाखा,युनिट १ चे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरख कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बाळु कोकाटे,सोमनाथ बोऱ्हाडे,महादेव जावळे,अजित रुपनवर** यांनी आरोपी **विलास बाळशीराम मोरे, वय ३८ वर्षे, राह- संतोष फुगे यांच्या रुममध्ये भाडयाने,दिघी रोड,भोसरी पुणे** याचा फुगे प्रायमा बिल्डींग,भोसरी,पुणे येथे शोध घेत असताना तांत्रिक विश्लेषन करुन गोपनिय माहिती काढुन त्यास फुगे प्रायमा बिल्डींग,भोसरी,पुणे येथुन ताब्यात घेतले आहे.

आरोपी **विलास बाळशीराम मोरे** याचेकडे केलेल्या चौकशी दरम्यान त्याचेवर चिखली,एमआयडीसी भोसरी,दिघी पोलीस ठाणे येथे वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे,अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदिप डोईफोडे,सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरख कुंभार,पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कानडे पोलीस अमंलदार बाळु कोकाटे,सोमनाथ बोऱ्हाडे,महादेव जावळे,बाळु कोकाटे,अमित खानविलकर,गणेश महाडिक,मनोजकुमार कमले,फारुक मुल्ला,सचिन मोरे,प्रमोद हिरळकर,उमाकांत सरवदे,अजित रुपनवर,स्वप्नील महाले,विशाल भोईर,तानाजी पानसरे तांत्रिक विश्लेषक पोलीस अमंलदार नागेश माळी,पोपट हुलगे यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे.